जागतिक बँक सहाय्य प्रकल्पांतर्गत "कार्यक्षमता सुधारणा" या घटकाखाली शासकीय/अनुदानित संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता व लवचिकता प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग

शासन निर्णय, क्रमांक : जाबँप्र-१०९३/[२६४०][६९]/व्यशि-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३० मे, १९९४

संदर्भ :- १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक : जीटीआय-१०९२/७५५९०/[२२०८] तांशि-२, दिनांक : १८ मे, १९९२.

२. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक : जाबँप्र-१०९३/[२६४०][६९]/तांशि-२, दिनांक : १३ जानेवारी, १९९४.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक : जीटीआय-१०९२/[२४३८][८९]/व्यशि-५, दिनांक : २४ जानेवारी, १९९४.

शासन निर्णय :- जागतिक बँक सहाय्य प्रकल्पांतर्गत राज्यातील पदविका व पदविकोत्तर तंत्र शिक्षणाचे मजबुतीकरण करण्याचा प्रकल्प सन १९९१-९२ पासून कार्यान्वित झाला असून सदर प्रकल्पांतर्गत विविध घटकाखाली ही योजना राबविण्यांत येत आहे. सदर योजनेखाली तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाचे मजबुतीकरण करण्यांत येत आहे. अलिकडे राज्यात नव्याने मोठया प्रमाणात अनुदानित व विना अनुदानित तंत्रनिकेतने सुरू करण्यांत आलेली आहेत, त्यामुळे तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाच्या कामावर या नव्याने स्थापन झालेल्या संस्थांचा अधिक प्रमाणात भार पडलेला आहे, त्यामुळे राज्यातील काही शासकीय/अनुदानित संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिल्यास तंत्र शिक्षण परीक्षा मंडळावर पडणा-या कामाचा भार काही प्रमाणात कमी होईल. तसेच या आधी शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करण्यांत आलेल्या ४ संस्थाचे शैक्षणिक यश पहाता असे दिसून येते की, स्वायत्तता प्रदान केल्यामुळे सदर संस्थांची शैक्षणिक प्रगती झपाटयाने होत आहे. कारण त्या संस्थांना उद्योगधंद्यांना पूरक असे योग्य ते अभ्यासक्रमात बदल करणे शक्य होते. त्यामुळे जागतिक बँक सहाय्य प्रकल्पांतर्गत ७ शासकीय/अनुदानित संस्थांना स्वायत्तता व लवचिकता प्रदान करण्याचा निर्णय घेण्यांत आला होता, त्यानुसार

संदर्भाधिन क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेस सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करण्यांत आलेली आहे. आता उर्वरित ६ शासकीय/अनुदानित तंत्रनिकेतनांना शैक्षणिक स्वायत्तता व लवचिकता प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई/पुणे/औरंगाबाद/के. जे. सोमय्या पॉलिटेक्नीक, मुंबई/ एस्. एच. साबुसिधीक तंत्रनिकेतन, मुंबई व सेंट झेवियर्स टेक्नीकल इन्स्टिटयुट, मुंबई या संस्थांना स्वायत्ततेची पूर्व तयारी करण्याकरिता संदर्भाधिन क्रमांक-२ येथील शासन निर्णयान्वये प्रत्येकी १ परीक्षा नियंत्रकाचे पद निर्माण करण्यात आले होते, तसेच संदर्भाधिन क्रमांक-३ येथील शासन निर्णयान्वये शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई/पुणे/औरंगाबाद या ३ संस्थांना स्वायत्ततेची पूर्व तयारी करण्याकरिता प्रत्येकी रु. १.०० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यांत आली होती.

३. आता जागतिक बँक सहाय्य प्रकल्पांतर्गत "कार्यक्षमता सुधारणा" या घटकाखाली संस्थांची शैक्षणिक दृष्टया विकास/प्रगती अधिक झपाटयाने साधता यावी तसेच राज्यात उदयास येत असलेल्या नवनवीन उधोगधंदयांना पूरक अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या परीक्षा व परीक्षा नियंत्रण यामध्ये आधुनिकता साध्य करण्यासाठी खालील ६ शासकीय/अनुदानित तंत्रनिकेतनांना पुढे निर्देशिलेल्या अटींचे अधीन राहून सन १९९४-९५ या वर्षापासून शैक्षणिक स्वायत्तता व लवचिकता प्रदान करण्यास व त्यानुसार अभ्यासक्रमात बहुबिंदू प्रवेश गुणांक पध्दतीचा अवलंब करण्यास याव्दारे शासनाची मंजूरी देण्यांत येत आहे.

१. शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई
२. शासकीय तंत्रनिकेतन, पुणे
३. शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद
४. के. जे. सोमय्या तंत्रनिकेतन, मुंबई
५. एस्. एच. साबुसिधीक तंत्रनिकेतन, मुंबई
६. सेंट झेवियर्स टेक्नीकल इन्स्टिटयुट, मुंबई.

अटी :-

१] शैक्षणिक स्वायत्ततेमुळे शासनावर कोणताही अधिक आर्थिक भार पडणार नाही.

२] सदर संस्था यापुढेही प्रशासकीय नियंत्रणाकरिता संचालक, तंत्र शिक्षण व शैक्षणिक प्रयोजनाकरिता तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ यांच्या पर्यवेक्षणाखाली राहतील.

३] शैक्षणिक कार्यक्रम/पध्दती वगैरेबाबत महत्त्वाचे बदल करण्यापूर्वी सदर संस्थांनी शासनाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

४] एखादया विशिष्ट कारणास्तव शैक्षणिक स्वायत्तता रद्द करणे आवश्यक असल्याचे शासनास आढळून आल्यास याबाबत कोणतीही पूर्व सूचना न देता प्रदान करण्यांत आलेली स्वायत्तता काढून घेण्यांत येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ वि. कि. कुंबाले ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रकल्प संचालक, जागतिक बँक प्रकल्प कार्यान्वियन एकक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अध्यक्ष, तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उपसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नासिक/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती.
उपसचिव, तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाची विभागीय कार्यालय, पुणे/ नागपूर/औरंगाबाद.
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ औरंगाबाद.
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई/ पुणे/ औरंगाबाद.
प्राचार्य, के. जे. सोमय्या तंत्रनिकेतन, मुंबई.
प्राचार्य, एम्. एच्. साबुसिधीक तंत्रनिकेतन, मुंबई
प्राचार्य, सेंट झेवियर्स टेक्नीकल इन्स्टिटयूट, मुंबई.
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, कार्यासन क्र. तांशि-२, तांशि-३, तांशि-४ तांशि-५ व अर्थसं-२.

निवड नस्ती, टयशि-५.

एनुके/३०. ५.

**महाराष्ट्र शासन**

**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**

अल्पसंख्याक विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/३८८/प्र.क्र.२२३/२००८/का.१, दिनांक :- २९ सप्टेंबर, २००८.

# अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

झेवियर इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग सोसायटी, माहिम, मुंबई या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२४.१०.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. दि.२२.०९.२००८ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी.एफ.थेकेकरा

**( टी. एफ. थेकेकरा )**

सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक: अशैसं-२००८/प्र.क्र.२२३/०८/का.१
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३०/०९/२००८.

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
झेवियर्स इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग सोसायटी,
माहिम, मुंबई.

विषय :- शैक्षणिक संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळणेबाबत.

महोदय,

अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक:अशैस-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दिनांक ४ जुलै, २००८ अन्वये आपण शैक्षणिक संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जास अनुसरुन आपल्या संस्थेचे धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मान्यतेचे प्रमाणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत : वरीलप्रमाणे.